# जाहीर नोटीस

## प्रमुख जिल्हा न्यायालय, रत्नागिरी या न्यायालयात

या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की,......

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांचे अधिपत्याखालील सर्व तालुका न्यायालयांमध्ये लाकडी टेबल (टेबल टॉप वर सनमायका व प्लायवूड) (२ X ४) चे **एकुण ५५ नग** खरेदी करणेचे आहेत.

तरी जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांचे अधिपत्याखालील **सर्व तालुका न्यायालयांमध्ये लाकडी टेबल (टेबल टॉप वर सनमायका व प्लायवूड) (२ X ४) चे एकुण ५५ नग** उधारीने योग्य दरात पुरविणे शक्य असेल, त्यांनी दरपत्रके (निविदा) खालील अटी व शर्तीस अधीन राहून ही नोटीस जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेपासून पंधरा दिवसांचे आत म्हणजेच दिनांक ०३/०६/२०२५ पर्यंत सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे समक्ष आणून द्यावीत.

## दरपत्रकांबाबत अटी व शर्ती

१. दरपत्रक आवश्यक त्या संपुर्ण तपशीलासह तारखेसहीत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे असावे. त्यामध्ये कर, वस्तुची किंमत इत्यादीबाबी स्वतंत्र नमुद कराव्यात. तसेच दरपत्रकामध्ये किंवा लेटरहेडवर SGST/CGST क्रमांक नमुद करावा व पॅनकार्डची झेरॉक्स प्रत दरपत्रकासोबत सादर करावी.

२. सदर लखोटयावर जिल्हा न्यायालय, रत्नागिरी व अखत्यारीतील न्यायालयांकरिता लाकडी टेबल खरेदी बाबतचे दरपत्रक असे नमुद असावे.

३. जाहीर नोटीस मधील दिलेल्या तारखेनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही.

४. सर्वात कमीत कमी दराने दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

५. पुरविणेत येणारे लाकडी टेबल यांची योग्य ती माहिती इकडे कळविणे बंधनकारक राहील.

६. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रके नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांना राहील.

आज दि. २०/०५/२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

प्रबंधक

**दिनांक— २०/०५/२०२५**

**जिल्हा न्यायालय, रत्नागिरी**

म.जा.क्र. वित्त/3002/२०२५
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
दिनांक— २०/०५/२०२५

**<u>प्रत नोटीसबोर्डावर व वेबसाईटवर प्रसिध्दीकरिता</u>**

१. सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडे
२. जिल्हा संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडे